स्वामी दत्तावधूत विरचित

श्री दुर्गा त्रिशती

ॐ वनिता बुक्स

मुंबई – ४०० ०१२.

श्री दुर्गा त्रिशती

- आवृत्ती पहिली – २००३
- आवृत्ती दुसरी – २००५
- आवृत्ती तिसरी – २००६
- आवृत्ती चौथी – २००९
- आवृत्ती पाचवी – २०१०
- आवृत्ती सहावी – २०११
- आवृत्ती सातवी – २०११
- आवृत्ती आठवी – २०१३
- आवृत्ती नववी – २०१५
- आवृत्ती दहावी – २०१६
- आवृत्ती अकरावी – २०१८

❖ प्रकाशक ❖

ॐ वनिता बुक्स

बी – २१३ सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था (पानवाला चाळ),

डॉ. एस. एस. राव मार्ग, लालबाग, मुंबई ४०० ०१२.

दूरध्वनी – (०२२) २४१८७३३९.

© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

मूल्य : रु. ४०/–

अनुक्रमणिका

१. मार्कण्डेय ऋषीप्रणीत देवी माहात्म्य.... १५

२. श्री देव्याकवच २०

३. दिव्य स्तोत्र..... २७

४. श्री अर्गला स्तोत्र ३०

५. शारदा स्तोत्र ३१

६. रात्री सूक्त..... ३३

७. भुवनेश्वरी स्तोत्र ३४

८. योगेश्वरी स्तोत्र ३७

९. श्रीदेवी अथर्वशीर्ष ३८

१०. देवी सूक्त ४३

११. नारायणीस्तुती ४९

१२. श्री दुर्गास्तुती ५४

सद्‌भक्तांचे अनुभव

श्री स्वामी दत्तावधूत यांनी **श्री दुर्गा सप्तशती** हा मूळ ग्रंथ लिहिला. श्री दुर्गा सप्तशती या मूळ ग्रंथातील सर्व स्तोत्रे एकत्र करून श्री दुर्गा त्रिशती ग्रंथ निर्माण करण्यात आला. श्री दुर्गा सप्तशती व श्री दुर्गा त्रिशती या दोन्ही ग्रंथांच्या वाचनाने आमचे कल्याण झाले, अशी असंख्य पत्रे व फोन कॉल्स आम्हाला आले. कुणाची संकटे टळली, कुणाच्या पिशाच्च बाधा दूर झाल्या. कोणाला अडचणीतून मार्ग मिळाला, अशा अनेक गोष्टी आमच्या कानावर येत आहेत व आनंद देत आहेत की, आपल्या ग्रंथांच्या वाचनाने अनेक लोकांचे चांगले होत आहे.

● त्रासातून सुटका ●

सांगलीतील सौ. पटवर्धन या अनेक त्रासाने व्यापलेल्या होत्या. जीवनाला कंटाळलेल्या होत्या. कुठल्यातरी कामाच्या निमित्ताने त्या कोल्हापूरला गेल्या. कोल्हापूरला त्यांनी महालक्ष्मीच्या मंदिरात

जाऊन महालक्ष्मीचे दर्शन घेतले. मंदिरातून बाहेर आल्या तेव्हा एक गरीब हडकुळा मुलगा त्यांच्या समोर येऊन म्हणू लागला, 'ताई, मला खूप भूक लागली आहे, ही पोथी घ्या व मला जेवणासाठी १० रुपये द्या !' सौ. पटवर्धन यांनी त्याला दोन रुपये देऊन स्वत:ची सुटका करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने पाठ सोडली नाही. तो सारखा म्हणू लागला, ''ही पोथी घ्या व मला १० रुपये द्या.'' त्याने असा बराच आग्रह केल्यानंतर सौ. पटवर्धन यांनी पोथी घेतली व त्याला त्या पोथीची किंमत ३० रुपये देऊ लागल्या. मुलगा म्हणाला, 'मला दहा रुपये पुरेत!' तरी पण सौ. पटवर्धन यांनी त्या मुलाला आग्रह करून ३० रुपये घ्यायला लावले व ती पोथी घेतली. **'ती पोथी होती, श्री स्वामी दत्तावधूत लिखित श्री दुर्गा सप्तशती !'**

महालक्ष्मीच्या मंदिरामध्ये श्री दुर्गा सप्तशती मिळाली म्हणून सौ. पटवर्धन यांना आनंद झाला. घरी गेल्यावर त्यांनी श्री दुर्गा सप्तशती वाचली. पुढील काही दिवसांत त्यांच्या सर्व समस्यांचे निराकरण झाले.

जीवनात आनंद निर्माण झाला. त्या पुन्हा महालक्ष्मीच्या दर्शनाला गेल्या व तेथे त्यांनी त्या मुलाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; परंतु तो मुलगा त्या परिसरात कोठेही सापडला नाही. इतकेच नव्हे तर महालक्ष्मी मंदिराच्या परिसरात व त्या गल्लीत कोठेही श्री स्वामी दत्तावधूतांची पुस्तके कोणीही दुकानदार विकत नाहीत, असे त्यांच्या लक्षात आले. यामुळे त्या मुलाच्या रूपाने परमेश्वरानेच आपल्याला मार्ग दाखविला, असे त्यांना वाटू लागले. घरी परत आल्यावर त्यांनी वनिता बुक्सला पत्र पाठवून सविस्तर हकिकत कळविली व श्री स्वामी दत्तावधूत यांची सर्व पुस्तके मागवून घेतली. त्यांचे जीवन सुखी झाले. सध्या त्या सेवा म्हणून श्री स्वामी दत्तावधूत यांची पुस्तके लोकांना भेट देतात. त्यांनी ज्यांना श्री स्वामी दत्तावधूत यांची पुस्तके दिली त्यांना खूप चांगले अनुभव आल्याचे सौ. पटवर्धन यांनी कळविले आहे.

● विवाह जुळला ●

कु. सुनिता हिचा विवाह जमत नव्हता. असे का होत आहे, हे कोणालाही कळत नव्हते. म्हणून त्यांनी एके ठिकाणी चौकशी केली. त्या ज्योतिष्याने त्यांना सांगितले की, मुलीने देवीची उपासना करायला हवी,

म्हणजे तिच्या लग्नात येणारी विघ्ने दूर होतील. देवीची उपासना करायची म्हणजे काय करायचे? असा विचार सुनिता करत असतानाच तिच्या एका मैत्रिणीने 'श्री दुर्गा त्रिशती' दिली. श्री दुर्गा त्रिशतीचे पाठ सुरू केल्यानंतर तिचे लग्न झाले व ती सुखी झाली.

● नोकरी वाचली ●

न्यू जर्सी (अमेरिका) येथे मनोज शेंडे राहतो. त्याचा एक मित्र त्याला म्हणाला, की कंपनीने मला नोकरीवरून काढून टाकले आहे. पुढील एक तारखेपासून मी बेकार होणार आहे. जगायचे कसे असा माझ्यासमोर प्रश्न आहे. शक्य झाले तर एखादी नोकरी माझ्यासाठी बघ. मनोज शेंडे याने श्री स्वामी दत्तावधूत यांची सर्व पुस्तके त्याला भेट म्हणून दिली व सांगितले, ''**ही सर्व पुस्तके तू वाच व श्री दुर्गा त्रिशती, संक्षिप्त श्रीगुरुचरित्र व श्री समर्थ सप्तशती** या पोथ्या नित्य वाचनात ठेव. परमेश्वराच्या कृपेने तुला नक्की मार्ग मिळेल !'' मनोजच्या मित्राने श्री स्वामीजींची सर्व पुस्तके वाचली व पोथ्या नित्य नियमाने

वाचण्यास सुरुवात केली. चार – पाच दिवसांनंतर कंपनीने त्याला पत्र पाठविले व आम्ही तुला नोकरीवरून काढून टाकत नाही, असे कळविले.

● पिशाच्च बाधेतून सुटका ●

पिशाच्च शक्तीच्या त्रासामुळे एक घराणे हैराण झालेले होते. श्री स्वामी दत्तावधूतांची पुस्तके वाचून ते प्रभावित झाले. त्यांनी घरामध्ये श्री दुर्गा सप्तशतीचे पाठ करणे सुरू केले. श्री दुर्गा सप्तशतीचे पाठ सुरू केल्यानंतर काही दिवसांनी त्या घराण्यातील मुख्य स्त्रीला स्वप्न पडले. 'आसुरी शक्तींबरोबरच देवी युद्ध करीत आहे.' असे स्वप्नात दिसले व स्वप्नातच त्यांना असे सांगितले गेले की, देवीचे आसुरी शक्तींबरोबर युद्ध सुरू झाले आहे. आता श्री दुर्गा सप्तशती वाचण्याऐवजी श्री दुर्गा त्रिशती वाचावी.

यावरून असे वाटते की, ज्यांना आसुरी शक्तींचा त्रास आहे फक्त त्यांनीच श्री दुर्गा सप्तशतीचे काही पाठ करावेत व नंतर श्री दुर्गा सप्तशतीचे पाठ बंद करून श्री दुर्गा त्रिशतीचे पाठ सुरू करावेत. ज्यांना

आसुरी शक्तींचे त्रास मुळीच नाहीत, अशा भक्तांनी श्री दुर्गा सप्तशतीतील फक्त देवी कवच, देवी सूक्त व नारायणी स्तुती वाचावी किंवा श्री दुर्गा त्रिशतीचे पाठ करावेत. स्वप्नातील आदेशाप्रमाणे त्या घराण्यातील सर्वांनी श्री दुर्गा त्रिशतीचे पाठ सुरू केले. दोन-तीन महिने श्री दुर्गा त्रिशतीचे पाठ केल्यानंतर त्यांचे सर्व त्रास दूर झाले. स्वामी दत्तावधूतांची पुस्तके व ग्रंथ अशा प्रकारे समाजातील दु:ख निवृत्तीचे व ज्ञान प्रदानाचे कार्य करीत आहेत.

● सद्‌गती ●

शैला मसुरकर गेली अनेक वर्षे श्री स्वामीजींची पुस्तके सेवा म्हणून लोकांना देण्याचे कार्य करीत आहे. एक दिवस तिच्या स्वप्नामध्ये तिचे वडील आले व म्हणाले, 'गेल्या १६ वर्षांत मी तुझ्या स्वप्नात आलो नाही. कारण माझ्यावर करणी केलेल्या तांत्रिकाच्या कैदेत मी होतो. तू जी पुस्तकांची सेवा केलीस त्या सेवेच्या पुण्याईमुळे माझी सुटका झाली. आमच्या काळामध्ये जर अशी पुस्तके निर्माण झाली असती तर माझ्यासारख्या असंख्य आत्म्यांचा उद्धार झाला असता !' शैलाच्या या दृष्टांतावरून श्री

स्वामीजींच्या पुस्तकांची सेवा केल्याने अदृश्य सृष्टीतील पूर्वजांच्या आत्म्याचाही उद्धार होतो हे सिद्ध होते. अशा अनेक घटना, असंख्य अनुभव आम्हाला कळत असतात, परंतु विस्तार भयास्तव ते देता येत नाहीत.

४ ऑक्टोबर २००५ **– प्रकाशक**

चौथ्या आवृत्तीची प्रस्तावना

● दिव्य दर्शन ●

सौ. निता आंगणे हिने नवरात्रामध्ये ९ दिवसात श्री दुर्गा त्रिशती या पोथीतील श्री दुर्गा कवच व श्री देवीसूक्त या स्तोत्रांचे प्रत्येकी एक हजार पाठ पूर्ण केले. दसऱ्याच्या दिवशी सकाळी सौ. निता ध्यान करत असताना तिला ध्यानामध्ये प्रथम सोनेरी प्रकाश दिसला व विराट रूपामध्ये देवी दिसली. तिच्या अंगावर हिऱ्या-मोत्यांचे दागिने होते व मागे तळपणारा सूर्य दिसला.

● देवत्वप्राप्ती ●

सौ. गीता श्री दुर्गा त्रिशती पोथीतील श्री देवी कवच, श्री देवी सूक्त, नारायणीस्तुती व श्री दुर्गास्तुती अशा सर्व स्तोत्रांचे सतत पाठ करत असे. या शिवाय श्री स्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्या व पुस्तके वाचत असे.

तिच्या फ्लॅटसमोर सौ. रचना नावाची एक स्त्री रहात असे. तिला अनेक समस्या होत्या.

रचनाला एका ज्योतिष्याने सांगितले की, 'तुझ्या फ्लॅट समोर जे २-३ फ्लॅटस् आहेत. त्यातील एका फ्लॅटमध्ये खूप दैवी शक्ती आहे. तेथील स्त्रिचे मार्गदर्शन जर तू घेतलेस तर तुझे कल्याण होईल.'

आपल्या फ्लॅट समोरील तीन फ्लॅटस् पैकी कुठल्या फ्लॅटमध्ये दैवी शक्ती आहे, असे चिंतन रचना करत असताना तिच्या डोळ्यासमोर सौ. गीता स्पष्टपणे दिसली. हा अनुभव आल्यानंतर तिने सौ. गीताला आपल्या घरी बोलविले, तिची ओटी भरली, आपले सर्व अनुभव तिला सांगितले व मार्गदर्शन

करण्याची तिला विनंती केली.

सौ. गीताने तिला स्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्या व पुस्तके वाचण्यास सांगितले व श्री दुर्गा त्रिशती या पोथीतील श्री देवी कवच, श्री देवीसूक्त व नारायणीस्तुती या प्रत्येक स्तोत्राचे ११०० पाठ पूर्ण करण्यास सांगितले.

सौ. संगिता नावाची एक स्त्री रोज ५ वेळा श्री देवीसूक्त वाचते. तिने आपले अनुभव पुढीलप्रमाणे कळविले आहेत. श्री देवीसूक्त वाचायला सुरुवात केल्यापासून घरातील भांडणे कमी झाली, वाईट स्वप्ने पडणे बंद झाले, उत्पन्न वाढले. एकदा नवरात्रामध्ये तिने श्री देवीसूक्त व नारायणीस्तुती या स्तोत्रांचे १४००-१४०० पाठ केले. त्यानंतर तिला देवीचे दर्शन झाले व ध्यान लागू लागले. तसेच ध्यानामध्ये देव-देवतांची दर्शने होऊ लागली.

आमच्या घरी ज्योत्स्ना नावाची एक मुलगी घरकाम करण्यासाठी येत असे. तिला मी दररोज ५ वेळा

श्री देवीसूक्त व ५ वेळा नारायणीस्तुती वाचण्यास सांगितली होती. ती नित्य नियमाने हे दोन्ही पाठ करत असे. ती घरात काम करत असताना एकदा मी कामानिमित्त बाहेर गेले होते. जेव्हा बाहेरून परत आले तेव्हा पाहिले की, ज्योत्स्नाच्या कपाळावर भले मोठे कुंकू लावलेले होते.

तिची चेष्टा करण्याच्या उद्देशाने मी तिला म्हणाले, ''ज्योत्स्ना, चांगलाच मळवट भरला आहेस !'' यावर ती खूप आनंदाने हसून म्हणाली.

''अहो ताई, काय सांगू तुम्हाला, मला आत्ता एक खूपच दिव्य अनुभव आला. इथे आत्ता देवी प्रगट झाली होती. तिने मला आशीर्वाद दिला व माझ्या कपाळाला कुंकू लावले !''

तिचा हा अनुभव ऐकून मलाही अतिशय आनंद झाला.

वाचकांचे असंख्य अनुभव पोथ्यांच्या प्रस्तावनेत टाकणे अशक्य आहे, त्यामुळे एक – दोनच अनुभव देत आहोत. म्हणून लक्षावधी अनुभवांपैकी अगदी मोजके निवडक अनुभव घेऊन 'ईश्वर भक्तीचे अनुभव'

हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. श्री स्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्यांविषयी व पुस्तकांविषयी आम्ही फक्त इतकेच म्हणू शकतो की, ज्या कोणाच्या हाती पोथ्या व पुस्तके पडली, त्या सर्वांचे अक्षरश: कल्याण झाले. ज्यांनी पोथ्या व पुस्तके वाटली त्या सर्वांचेही कल्याण झाले. फक्त हिंदू धर्मातील लोकांचेच कल्याण झाले असे नव्हे, तर इतर धर्मातील लोकांचेही कल्याण होत आहे. असे अनुभवही आम्हाला कळत आहेत.

या आवृत्तीच्या प्रस्तावनेनिमित्त यापेक्षा जास्त काय लिहू? आज सुमारे ५ लाखाहून अधिक घरांमध्ये श्री स्वामी दत्तावधूतांनी लिहिलेल्या पोथ्या श्रद्धेने वाचल्या जात आहेत. ईश्वरच हे ईश्वरी कार्य करत आहे दुसरे काय !

२८ सप्टेंबर २००९ (विजया दशमी) **– प्रकाशक**

।। श्री दुर्गा त्रिशती ।।

।। मार्कण्डेय ऋषीप्रणीत देवी माहात्म्य ।।

मार्कण्डेय श्रोत्या लागोन । म्हणे ऐका सावधान । सूर्यपुत्र सावर्णी आख्यान । आठवा मनु ज्या म्हणती ।। १ ।। स्वारोचिष मन्वंतर । सुरथ नृप महीवर । चैत्र कुलोत्पन्न वीर । पृथ्वीवरी राज्य करी ।। २ ।। मातेपरी प्रजापालन । धर्ममार्गी सदा मन । कोला विध्वंसी शत्रुगण । चालून आले तयावरी ।। ३ ।। राव पराक्रमी थोर । परी युद्धात जाहली हार । मंत्री सेनानी समग्र । विरोधी त्यांसी जाहले ।। ४ ।। गेला सर्व प्रभाव । राजा झाला दीन मानव । अश्वावरी होऊनी स्वार । काननांतरी रिघाला ।। ५ ।। शिकारीचे करूनी निमित्त । राव काननी निघून जात । मेधा मुनी आश्रम पाहत । शांती अपार लाभतसे ।। ६ ।। मुनी करीतसे स्वागत । राजा होई स्वस्थचित्त । काही काळ राही तेथ । शांत मन

करावया ।।७।। ऐसे काही दिन जात । मन पुन्हा होई अशांत । म्हणे मी नृप असोन येथ । काननी येवोनी पडलो का ? ।। ८ ।। काय झाले असेल राज्याचे । काय झाले असेल द्रव्याचे । हाल काय प्रजेचे । झाले न कळे मजलागी ।। ९ ।। माझे भ्रष्ट सेवक । शत्रूते मिळोन सम्यक । प्रजेसी देती दु:ख । काय करावे कळेना ।। १० ।। चिंता करी निरंतर । मन अस्वस्थ आणि अधीर । न राहे एक क्षण स्थिर । व्याकुळ जाणा होतसे ।। ११ ।। ऐसा राहे आश्रमात । तव एक दिन देखत । एक वैश्य चिंताग्रस्त । तये ठायी पातला ।।१२।। देखोनिया वैश्यासी । राजा विचारी तयासी । काय दु:ख तुम्हासी । चिंताग्रस्त दिसतसा ।। १३ ।। ऐकोनी नृपाचा प्रश्न । वैश्य म्हणे तया लागोन । मी उत्तम कुलोत्पन्न । समाधी नाम मजलागी ।। १४ ।। होतो बहु धनवान । परी स्त्री – पुत्रे दिले हाकलोन । येथे आलो म्हणोन । शांती लाभाया कारणे ।। १५ ।। परी मन अशांत । स्त्री – पुत्राते चिंतीत । काय असतील करीत । म्हणोनी चिंती मानसी ।। १६ ।। असतील ते सदाचारी । अथवा होतील

दुराचारी । सुखी असती की कष्टी । म्हणोनी चिंता करीतसे ।। १७ ।। हासोनी राजा म्हणत । जे तुजला हाकलीत । त्याज कारणे चिंता करीत । मूर्खत्व जाणा हे असे ।।१८।। वैश्य म्हणे आपुले वचन । योग्य परी न राहे मन । स्त्री – पुत्रांते आठवोन । सदा चिंता करीतसे ।। १९ ।। धन लुटाया कारण । मज दिधले हाकलोन । परी चित्त प्रेममग्न । होऊनी चिंता करीतसे ।। २० ।। ऐसे का आहे होत । हे न कळे मजप्रत । कवण माया अद्‌भुत । खेळ सारा हा रचे ।। २१ ।। ऐसा विचार करीत । सुरथ राजा आणि वैश्य । उभय मुनीते वंदित । सांगती सारे तयासी ।। २२ ।। राजा म्हणे मुनीसी । हे नकळे मानसी । ही काय माया तू जाणसी । सांगा कृपा करोनिया ।। २३ ।। मी राज्यभ्रष्ट दु:खित । वैश्य गृहभ्रष्ट दु:खित । तरीही चिंतितो मनात । कल्याण आम्ही स्वजनांचे ।। २४ ।। ही महामाया काय । विवेकशून्य मती होय । कोठोनी निर्माण होय । कृपा करोनी सांगावे ।। २५ ।। ऋषी म्हणे भगवती । विश्वरचना करे ती । समस्त प्राणीमात्रांची गती । तिच्या आधीन

राहतसे ।। २६ ।। पक्षिणी प्रभाती उडत । सायंकाळी मागे फिरत । कोण त्यांसी प्रेरणा देत । लीला महामायेची ।। २७ ।। गाय, बैल, अश्व, श्वान । न जाती गृहा सोडोन । आपुले उदर भरोन । पुन्हा येती माघारा ।। २८ ।। काही प्राणी दिवांध । काही असती रातांध । काही दिन–रात्री पाहत । ऐसे विविध प्राणी ते ।। २९ ।। ऐसे विविध प्राणी । तेही गेले मोहोनी । पिपिलिका कण देखोनी । भक्षावया धावतसे ।। ३० ।। धावे गज पोटासाठी । धावे व्याघ्र मृगापाठी । मृग धावे तृणापाठी । महामायेच्या प्रभावाने ।। ३१ ।। ऐसे जीव धावत । उदर भरण्यासाठी पळत । त्यातची संसार करीत । पाळती आपुल्या पिल्लांसी ।। ३२ ।। उदर भरण आणि संतान पालन । हेची जीव करिती जाण । मनुष्य काय याहून । अधिक जाणा करीतसे ।। ३३ ।। परी मनुष्य मूर्ख अधिक । प्रतिफळ सदैव अपेक्षित । महामायेसी नोळखित । म्हणोनी दु:खी होतसे ।। ३४ ।। ते महामाया भगवती । श्रीविष्णुची निद्रास्थिती । सर्व जीव मोह पावती । तिच्या प्रभावे करोनिया ।। ३५ ।। पंडित आणि

महाज्ञानी । ऐशा जना पाहोनी । विविध प्रकारे मोहवूनी । ठेवी महामाया ती ।। ३६ ।। त्या महामाया भगवतीने । विश्व रचिले हे सारे । तिच्या आधीन राहिले । जगत् संपूर्ण सर्वदा ।। ३७ ।। ती सर्व ईश्वरांची परमेश्वरी । परा विद्या अखिलेश्वरी । बंधन–मोक्ष सर्वेश्वरी । सर्व तीच करीतसे ।। ३८ ।। तिच्या कृपेने धर्माचरण । तिच्या कृपेने तीर्थाटन । तिच्या कृपेने पुरश्चरण । होती हातून मानवाच्या ।। ३९ ।। ती होता प्रसन्न । सायुज्यमुक्तीचे वरदान । भक्तालागी देवोन । मुक्त त्यासी करीतसे ।। ४० ।।

।। स्वस्ति देवी माहात्म्य संपूर्ण ।।

।। श्री देव्याकवच ।।

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः । ॐ नमश्चण्डिकायै । या दुर्गा कवचाते । ब्रह्माऋषी म्हणा वाचे । मातृका बीज दिग्बंध तत्त्वाते । नवदुर्गा देवी असे देखा ।। १ ।। सर्व शुभकार्यारंभी । कवच पठण करावे आधी । श्री जगदंबा प्रीत्यर्थी । जपे विनियोगा म्हणावे ।। २ ।। ॐ मार्कण्डेय म्हणे पितामह । या लोकी जे परम गुह्य । सर्व रक्षा कर स्तोत्र । ते सांगावे मजलागी ।। ३ ।। ऐकोनिया ऋषिवचन । म्हणे ब्रह्मदेव आपण । देवीकवच महापुण्य । सांगेन ऐक मुनिवर्या ।। ४ ।। प्रथमम् शैलपुत्री च । द्वितीयम् ब्रह्मचारिणी । तृतीयम् चन्द्रघण्टेती । कूष्माण्डेती चतुर्थकम् ।। ५ ।। पंचमम् स्कंद मातेती । षष्ठम् कात्यायनीती च । सप्तमम् काल रात्रिती । महागौरीती चाष्टमम् ।। ६ ।। नवमम् सिद्धीदात्री च । नवदुर्गा प्रकीर्तीता । ब्रह्मदेव सांगता । झाला पाहा सर्वांसी ।। ७ ।। शरणागतासी सर्वत्र । दुर्गादेवीचा अभयकर । रक्षितसे निरंतर । महाभया पासोनिया ।। ८ ।।

अग्नित पडता भक्त । रणांगणी युद्धात । अथवा महाआपत्तीत । दुर्गा रक्षित सर्वदा ।।९।।
त्यासी नसे अशुभ काही । दुर्गा ज्याची धरे बाही । शोक दु:ख भय त्यास नाही । सर्वत्र
विजयी सर्वदा ।। १० ।। जे भक्तीने स्मरण करिती । त्यासी तात्काळ देई प्रचिती ।
आयुरारोग्य आयुष्य संपत्ती । देवी त्यासी देतसे ।। ११ ।। दिव्यासनी चामुण्डा । दुर्गा जयंती
दिव्यांगना । ऐन्द्री गजवाहना । ऐसी रूपे अंबेची ।। १२ ।। वैष्णवी गरुडासनी । माहेश्वरी
वृषभवाहनी । कौमारी मयुरासनी । ऐसी वाहने अंबेची ।। १३ ।। हरिप्रिया महालक्ष्मी ।
पद्मासनात बसोनी राही । पद्महस्त धरोनी देई । संपदा आपुल्या भक्तासी ।। १४ ।।
श्वेतरूप धरा देवी । वृषभ वाहन ईश्वरी । हंसवाहिनी ब्राह्मी । ऐशा मातृदेवता ।। १५ ।। ऐसी
रूपे अनेक । धरोनी जग रक्षित । भक्तांते प्रतिपाळीत । दुर्गादेवी सर्वदा ।। १६ ।। अलंकार
आभूषणे । तेज सौंदर्याचे लेणे । देव देवता एकपणे । दुर्गास्वरूपी जाहल्या ।। १७ ।। ऐसी दुर्गा
प्रकटली । सिंह वाहनी आरुढली । भक्तोद्धारा सिद्ध झाली । अनेक रूपे घेवोनिया ।। १८ ।।

शंख चक्र गदा शक्ती । परशु पाश अंकुश करी । धरोनी सिद्ध जाहली । भक्तोद्धार करावया ।। १९ ।। करावया आर्तांचे रक्षण । शस्त्रे धरी हाती दारुण । देवतांचे करी रक्षण । अभय देई भक्तांसी ।। २० ।। ऐशा जगत्जननीचे । स्तवन करावे मनोवाचे । मानव– देव समूहाचे । रक्षण जिने केले सदा ।। २१ ।। ॐ नमो नारायणी । त्रिपुरसुंदरी महास्वामिनी । महाबले ज्ञानदायिनी । दुर्गे देवी नमोस्तुते ।। २२ ।। दुर्गे करी मम रक्षण । दश दिशा कडोन । तुजकडे पाहे कोण? । तुज नमस्कार आमुचा ।। २३ ।। पूर्व दिशेकडे ऐन्द्री । आग्नेय दिशेकडे अग्निमयी । दक्षिणेकडून मयूरवाहिनी । रक्षी माते सर्वदा ।। २४ ।। हाती खड्ग घेवोनी । रक्षी नैर्ऋत्य दिशेकडूनी । पश्चिमेकडून वारुणी । वायव्यी रक्षी दुर्गे तू ।। २५ ।। उत्तर दिशेसी कौमारी । ईशान्यी शूलधारिणी । उर्ध्वं ब्रह्माणी रक्ष । अधो वैष्णवी पाही तू ।। २६ ।। दाही दिशांकडून । रक्षी देवी कृपा करोन । आणि मजला सोडून । दुर्गे कधी तू राहू नको ।। २७ ।। जयादेवी तू पुढून रक्षी । विजयादेवी तू पाठ रक्षी । वाम बाजूने अजिता रक्षी । रक्षी दक्षिणे

अपराजिता ।। २८ ।। शिखेसि रक्षी उद्योतिनी । उमा राही मम मस्तकी । मालाधरी ललाट रक्षी । भुवया यशस्विनी राखी तू ।। २९ ।। त्रिनेत्रधारिणी दुर्गे । कूटस्थ राखावे माझे । यमघण्ट नासिकेते । रक्षावे सदा देवी तू ।। ३० ।। कर्ण द्वारवासिनी । नेत्र पाहे शंखिनी । कालिका कपाळ पाही । शांकरी कर्णमूलाते ।। ३१ ।। सुगंधा नासिका रक्षी । उत्तरोष्ठ चर्चिका देवी । अधरोष्ठाते अमृता पाही । जिव्हाग्री सरस्वती राहे तू ।। ३२ ।। कण्ठ आणि दात । चण्डिका कौमारी रक्षत । चित्रघंटा राही गळ्यात । टाळू महामाये रक्षी तू ।। ३३ ।। हनुवटीत राहो कामाक्षी । सर्व मंगला वाचा रक्षी । महादेवी मान रक्षी । धनुर्धरी रक्षी पाठ तू ।। ३४ ।। कंठा बाहेर भागासी । नीलग्रीवा तू त्यासी । नलिकांसी नल कुबरी । देवी तू ते रक्षावे ।। ३५ ।। खड्गिनी देवी खांद्याते । वज्रधारिणी बाहूते । दण्डिनी रक्षी हाताते । अंबिका अंगुली रक्षी तू ।। ३६ ।। नखांसी रक्षी शूलेश्वरी । जठराते रक्षी कुलेश्वरी । स्तनाते रक्षी महादेवी । मनासी शोकनाशिनी तू ।। ३७ ।। ललिता रक्षी हृदयास । शूलधारिणी उदरास ।

नाभीसी कामिनी रक्ष । गुह्यासी गुह्येश्वरी तू ।। ३८ ।। भगवती राखी कटीसी । दुर्गा सर्वांगासी । लक्ष्मी देई संपत्तीसी । विद्या विंध्यवासिनी तू ।। ३९ ।। महाबला पोटऱ्या राखी । तैजसी राखी पायासी । नारसिंही दोन्ही घोटऱ्यांसी । पादांगुली श्रीदेवी तू ।। ४० ।। सर्व मंगला सर्वांगासी । ईश्वरी सर्व चक्रांसी । कौबेरी रक्षी रोम छिद्रांसी । त्वचेसी वागेश्वरी तू ।। ४१ ।। रक्त मज्जा मांस अस्थिसी । पार्वती तू ते रक्षी । कालरात्री पाही आतड्यांसी । मुकुटेश्वरी रक्षी पित्ताते ।। ४२ ।। पद्मावती षड्चक्राते । चुडामणी पाही कफाते । ज्वालामुखी पाही नखाते । रक्षी अभेद्या सर्व सांध्यांसी ।। ४३ ।। ब्रह्माणी देवी शुक्र राखी । छत्रेश्वरी छाया राखी । अहंकार मन बुद्धी राखी । धर्मधारिणी देवी तू ।। ४४ ।। प्राण अपान व्यान उदान । आणि पाचवा तो समान । या वायूते रक्षावे जाण । वज्रहस्ता देवीने ।। ४५ ।। शब्द स्पर्श रूप रस गंध । याते योगिनी रक्षित । सत्त्व रज तम गुणांस । रक्षी नारायणी देवी तू ।। ४६ ।। मम आयुष्याचे रक्षण । महालक्ष्मी करी स्वये आपण । धर्मकार्याचे संरक्षण । वैष्णवी

त्वा करावे ।। ४७ ।। यश कीर्ती लक्ष्मी धन विद्या । चक्रिणी रक्षी सर्वथा । इंद्राणी सर्व गात्रांते । चण्डिके स्वभाव रक्षी तू ।। ४८ ।। भक्ती रक्षे महालक्ष्मी । शक्ती रक्षी भैरवी । सन्मार्ग सुपथा देवी । दावी माते सर्वदा ।। ४९ ।। क्षेम करी देवी मार्गांत । महालक्ष्मी राजदरबारात । विजयादेवी राखोत । सदा सर्वदा मजलागी ।। ५० ।। कवचात नाही वर्णने । जयंतीने रक्षावी ती स्थाने । पाप नाश करोनी । सन्मार्गी न्यावे सर्वांसी ।। ५१ ।। ज्यासी वाटे शुभ व्हावे । त्याने कवचावृत्त व्हावे । एकही पाऊल न टाकावे । कवचाविण सर्वथा ।। ५२ ।। ऐसे करिता देख । सर्वत्र विजय होत । मनी धरिले सिद्ध होत । सद्भक्तांचे सर्वदा ।। ५३ ।। परम ऐश्वर्य होई प्राप्त । निर्भय सदैव राहत । संग्रामी अपराजित । त्रिलोकी पूज्य होतसे ।। ५४ ।। हे दुर्गेचे कवच । देवांनाही दुर्लभ असत । त्रिकाल वाचिता नित्य । दैवी कला प्राप्त होतसे ।। ५५ ।। त्रिलोकी विजय होत । शत वर्षे आयु भोगत । अपमृत्यू न होत । पुण्यवान त्या पुरुषाचा ।। ५६ ।। सर्व व्याधि नष्ट होती । विष सर्वही निवारिती । करणी मंत्र तंत्र

पळती । पठणे नित्य कवचाच्या ।। ५७ ।। कवच हृदयी धरिले । दुर्गेने त्यासी रक्षिले । ऐसे माहात्म्य आगळे । कवचा माजी असे हो ।। ५८ ।। वंदन करी नृपती । यशवर्धन कीर्ती । कवच, जप, सप्तशती । ऐसे माहात्म्य दुर्गेचे ।। ५९ ।। यावत्चंद्र दिवाकर । पृथ्वी नक्षत्र ग्रह थोर । कीर्ती राहे तोवर । ऐसा महिमा दुर्गेचा ।। ६० ।। पुत्रपौत्र सुखे नांदती । देहांती परमगती । शिवसान्निध्याची प्राप्ती । दुर्गा देई भक्तांते ।। ६१ ।।

।। स्वस्ति श्रीदेव्याकवच संपूर्ण ।।

।। दिव्य स्तोत्र ।।

ॐ दिव्य स्तोत्राते । महाविष्णु निर्माण करिते । महालक्ष्मी देवता प्रीत्यर्थे । जाहले पूर्वी परियेसा ।। १ ।। ॐ जयन्ती मंगला नारायणी । सर्वतो भद्रा मृणालिनी । दुर्गा क्षमा शिवा धात्री । स्वाहा स्वधा नमोस्तुते ।। २ ।। चामुण्डा तुझा जयजयकार । मानवाचे दु:ख करी दूर । स्मरता धावसी तत्पर । कालरात्री तुज नमो ।। ३ ।। देवता करिती जयजयकार । ब्रह्मदेवा देसी वर । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। ४ ।। जे तुझे ध्यान करीत । त्यासी प्रसन्न होसी त्वरित । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। ५ ।। तू योग्यांची माऊली । सर्पाकार कुल कुंडलिनी । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। ६ ।। जे तुझी भक्ती करीत । त्यांसी सदैव प्रति पाळीत । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। ७ ।। तव चरणयुगुलांचे वंदन । करिती सौभाग्या कारण । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। ८ ।। अचिंत्य रूप चरिते । सर्व शत्रू विनाशिनी । रूप जय यश देई ।

सदैव देवी आमुते ।। ९ ।। जे तुझे भक्तीने स्तवन करीत । पापापासून दूर राहत । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।।१०।। चण्डिके पूर्वी भक्तांनी । स्तविले व्याधिनाशिनी । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। ११ ।। चण्डिके जे कोणी भक्त । तुझी आराधना करीत । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। १२ ।। दे सौभाग्य आरोग्य । देई माते परम सुख । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। १३ ।। आनंद भक्ती शांती । यांनी भरो ही क्षिती । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। १४ ।। देवी माझे कल्याण । करी संपत्ती प्रदान । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। १५ ।। देवता आणि महाऋषी । सदैव तुझे चरण ध्याती । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। १६ ।। विद्यावंत करी यशवंत करी । लक्ष्मी भक्ता तू देई । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। १७ ।। भक्तोद्धारा कारण । केले कष्ट दारुण । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। १८ ।। ब्रह्मदेव स्तवन करी । ऐशी तू परमेश्वरी । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। १९ ।।

विष्णु तुझे चिंतन । सदा करी तव स्तवन । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। २० ।। महादेव हिमनग जामात । परमेश्वरी तुते स्तवित । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। २१ ।। स्वर्ग लोकीचा इंद्र । परमेश्वरी तुज स्तवन करीत । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। २२ ।। सिद्धी सामर्थ्य देवोन । केले भूमिसी पावन । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। २३ ।। भक्तांते आनंद देत । वर आणि मोक्ष देत । रूप जय यश देई । सदैव देवी आमुते ।। २४ ।। भक्ती ज्ञान सुंदर । भवसागर करी पार । उत्तम गुण साचार । आचरण मोक्षमार्गाचे ।। २५ ।। या स्तोत्राचे करिता पठण । दिव्यशक्ती संपन्न । सद्गुण प्राप्त होवोन । विजयी होई सर्वदा ।। २६ ।।

।। स्वस्ति दिव्यस्तोत्र संपूर्ण ।।

।। श्री अर्गला स्तोत्र ।।

ॐ ऐम् ऱ्हीम् श्रीम् क्लीम् परमेश्वरी स्वाहा । आदि अंतरहित देवी । परात्पर परमेश्वरी । भक्ती दे ज्ञान दे शांती दे । करुणेश्वरी ।। १ ।। देवी पूर्वी प्रकटोन । अपार उद्धरिले जन । भक्ती दे ज्ञान दे शांती दे । करुणेश्वरी ।। २ ।। जागृती स्वप्न सुषुप्तीत । राही सदैव ध्यानात । भक्ती दे ज्ञान दे शांती दे । करुणेश्वरी ।। ३ ।। दुर्गा दुर्गार्ती शमनी । म्हणून प्रार्थिती ऋषिमुनी । भक्ती दे ज्ञान दे शांती दे । करुणामयी ।। ४ ।। देवता वंदिती चरण । ऐसे तुझे महिमान । भक्ती दे ज्ञान दे शांती दे । करुणामयी ।। ५ ।। विष्णुने स्तविले तुजसी । सनत् कुमार स्तवी तुजसी । भक्ती दे ज्ञान दे शांती दे । करुणामयी ।। ६ ।। सर्व ईश्वरांची ईश्वरी । ऐम् ऱ्हीम् श्रीम् क्लीम् परमेश्वरी । भक्ती दे ज्ञान दे शांती दे । करुणेश्वरी ।। ७ ।। दत्तावधूताचे अंतरी । व्यापोनी राहे सर्वेश्वरी । भक्ती दे ज्ञान दे शांती दे । करुणेश्वरी ।। ८ ।। देई सर्व सद्गुण । सायुज्यमुक्तीचे स्थान । परमात्म्याशी मिलन ।

देई तव भक्ताते ।। ९ ।। भरो शांतीने विश्व । व्हावे आध्यात्मिक विश्व । भक्ती ज्ञान प्रेमयुक्त । व्हावे अखिल विश्व हे ।। १० ।।

।। स्वस्ति श्रीदत्तावधूत विरचित श्री अर्गला स्तोत्र संपूर्ण ।।

।। शारदा स्तोत्र ।।

ॐ अस्य शारदा स्तोत्रासी । भगवान शिव असे ऋषी । दिव्य ओवी छंदासी । महासरस्वती देवता देखा ।। १ ।। ग्रंथ पाठाचे अंग म्हणोन । या स्तोत्राचे करावे पठण । जगदंबा प्रीत्यर्थे म्हणून । जपे विनियोग: म्हणावे ।। २ ।। विशुद्ध ज्ञान ज्याचे शरीर । तिन्ही वेद दिव्य नेत्र । मुकुट ज्याचा अर्धचंद्र । त्या शिवासी नमितसे ।। ३ ।। करोनी

शिवाचे स्मरण । करावे ग्रंथ पारायण । होईल त्याचे कल्याण । शिवकृपेने सर्वदा ।। ४ ।। नको मंत्र पुरश्चरण । नको विद्यादी साधन । होतील सर्व इच्छा पूर्ण । पठणमात्रे ग्रंथाच्या ।। ५ ।। स्वये महादेव म्हणत । हा असे दिव्य ग्रंथ । दुर्गादेवी मूर्तिमंत । पठणे साकार होतसे ।। ६ ।। करिता सहस्त्र पारायण । अंबा होतसे प्रसन्न । ऐसे असे महिमान । दुर्गा स्तवन ग्रंथाचे ।। ७ ।। स्पष्ट उच्चारणासहित । पठण करावा ग्रंथ । ऐसे करिता सिद्ध । ग्रंथ जाणा होतसे ।। ८ ।। तो देवीचा अनुचर । होऊनी राहे बरोबर । अंतरिक्षात संचार । देवीसवे करी सदा ।। ९ ।। श्री दुर्गादेवी प्रसन्न । होऊनी देई वरदान । ऐश्वर्य आरोग्य संपन्न । प्राप्त जाणा होतसे ।। १० ।। कल्याणमयी जगदंबा । भक्ताते प्रतिपाळी सदा । करतळी जैसा आवळा । तैसा मोक्ष करीतसे ।। ११ ।।

।। स्वस्ति शारदा स्तोत्र संपूर्ण ।।

।। रात्री सूक्त ।।

ॐ रात्री सूक्त स्तोत्रासी । कौशिक भारद्वाज ऋषी । रात्री देवता परियेसी । गायत्री छंद म्हणावा ।। १ ।। ऐसे म्हणोनी वेदोक्त । पठण करावे रात्री सूक्त । दिव्य ग्रंथ पाठाअंतर्गत । विनियोग याचा करावा ।। २ ।।

।। अथ रात्री सूक्त प्रारंभ ।।

ॐ नमो रात्री देवी । शुभा-शुभ कर्म जीवी । होती जाती जी विश्वी । त्यासी साक्षी राहसी तू ।। ३ ।। वृक्ष लतादी समग्र । जीव सृष्टीसी आधार । हरिसी अज्ञान अंध:कार । क्षण मात्रे तू भक्ताचा ।। ४ ।। तुझी जव कृपा होत । अज्ञान समूळ नष्ट होत । उषा देवी प्रकटत । हृदयामाजी भक्ताच्या ।। ५ ।। तुझिया प्रभावे करोन । जीवसृष्टी करे शयन । सुखपूर्वक निद्राधीन । जग संपूर्ण होतसे ।। ६ ।। हे देवी चित्शक्ती । आम्हावरी करी

दृष्टी । दुष्ट वासना दुर्बुद्धी । नष्ट आमुची तू करी ।। ७ ।। भक्ती ज्ञान सन्मार्ग । परमात्मा परमेश्वर । दावी आम्हा मोक्ष मार्ग । ऐसी कृपा तू करी ।। ८ ।। रात्री देवीचे स्तवन । पाठा आरंभी करोन । करोनी तिजला वंदन । उदयोस्तु अंबे म्हणावे ।। ९ ।।

।। स्वस्ति रात्री सूक्त संपूर्ण ।।

।। भुवनेश्वरी स्तोत्र ।।

ॐ विश्वेश्वरी जगद्धात्री । स्थिती संहार कारिणी । श्रीविष्णूची मोहिनी । तेजस्विनी तुज नमो ।। १ ।। तू स्वाहा तू स्वधा नित्या । तू वषट्कार स्वरात्मिका । सुधा अक्षर तू नित्या । मात्रात्मिका तुज नमो ।। २ ।। अर्ध मात्रेत स्थित । जी शक्ती अतिरिक्त । संध्या, सावित्री आरक्त । जगत् जननी तुज नमो ।। ३ ।। करिसी विश्वासी धारण । करिसी

विश्वाचे पालन । अंती नाश संपूर्ण । या विश्वाचा करिसी तू ।। ४ ।। उत्पन्न करिसी विश्व जेव्हा । म्हणती ब्रह्माणी तुज तेव्हा । पालन करिसी विश्व जेव्हा । वैष्णवी ऐसे तुज म्हणती ।। ५ ।। कल्पांती संहार जेव्हा । रुद्राणी म्हणती तेव्हा । उत्पत्ती स्थिती लय कारणा । जगन्माया तुज म्हणती ।। ६ ।। महाविद्या महामाया । महामेधा महास्मृती । महामोहा महादेवी । महेश्वरी परमेश्वरी ।। ७ ।। ऐसी नामे अनंत । गुणत्रयाते विभाजित । प्रकृतिरूपे खेळवीत । सर्व जाणा विश्वाते ।। ८ ।। तुज म्हणती कालरात्री । महारात्री मोहरात्री । श्रीविष्णूचे नेत्रांतरी । राहुनी निद्रिस्थ त्या केले ।। ९ ।। ॐ ऐम् ह्रीम् श्रीम् क्लीम् परमेश्वरी स्वाहा । मन बुद्धीते अगोचर पाहा । विश्वव्यापी विश्वेश्वरी हा । महामंत्र तुझा असे ।।१०।। लज्जा तुष्टी पुष्टी शांती । क्षमा आणि सद्‌बुद्धी । आत्मस्वरूपाची जागृती । तुझिया कृपे होतसे ।। ११ ।। खड्ग शूल गदा चक्र । शंख बाण चाप घोर । करी विश्वाचा उद्धार । अभय देई भक्तांते ।। १२ ।। करावया भक्तांचा उद्धार । धरी रूपे वारंवार । कमलासनी

कोमल । सौम्य शामल मूर्ती ती ।। १३ ।। शांत सौम्य सुंदर । रूप जिचे मनोहर । सदैव स्मित मुखावर । नित्य राहे जियेच्या ।। १४ ।। ऐसी तू परमेश्वरी । परात्पर अखिलेश्वरी । विश्वरूप विश्वेश्वरी । आदिशक्ती तुज नमो ।। १५ ।। कैसे तुझे स्तवन । करू म्हणे ब्रह्मा आपण । जगत् पालक नारायण । त्यासी निद्रिस्थ त्वा केले ।। १६ ।। उत्पत्ती स्थिती लय जो करी । ऐसा जो श्रीहरी । त्यासी निद्रिस्थ करी । ऐसा महिमा जियेचा ।। १७ ।। ऐसी तू माहेश्वरी । सर्व देवतांची परमेश्वरी । कोण तुझी स्तुती करी । ऐसे सामर्थ्य कवणाचे ।।१८।। अज्ञान आणि अंध:कार । यांसी दूर करी सत्वर । नातरी हे भयंकर । उत्पात आता माजविती ।। १९ ।। करी विष्णूसी जागृत । देई बुद्धी तयाप्रत । आत्मस्थिती व्हावया प्राप्त । वंदन तुते करीतसे ।। २० ।।

।। स्वस्ति भुवनेश्वरी स्तोत्र संपूर्ण ।।

।। योगेश्वरी स्तोत्र ।।

जय देवी महामाये योगिनी क्षेत्र मण्डले ।
अम्बापूर निवासिन्यै योगेश्वरी नमोस्तुते ।। १ ।।
चिद्रूपिणि चिदानन्द सदने चिद् विलासिनी ।
सच्चिन्मय चिदाकारे योगेश्वरी नमोस्तुते ।। २ ।।
परं ज्योतिः परं धाम श्री पूर्णे परमेश्वरी ।
श्रीम् ह्रीम् क्लीम् मंत्र संपूज्ये योगेश्वरी नमोस्तुते ।। ३ ।।
खड्ग पात्र दण्ड हस्ते स्वर्णालंकृत लाङ्गले ।
विद्युत्प्रभे ब्रह्मवंद्ये योगेश्वरी नमोस्तुते ।। ४ ।।
श्री सूक्त योगिनी मन्त्र पाठ याग प्रपूजिते ।
शरण्ये वरदे चण्डी योगेश्वरी नमोस्तुते ।। ५ ।।

।। स्वस्ति योगेश्वरी स्तोत्र संपूर्ण ।।

।। श्री देवी अथर्वशीर्ष ।।

सर्व देवता मिळोन । पुसती देवी लागोन । महादेवी तव स्वरूप पूर्ण । विशद आम्हा तू करी ।। १ ।। देवी म्हणे मी शून्य । निराकार निर्गुण । आदि अंतरहित पूर्ण । ब्रह्मसनातन मी असे ।। २ ।। प्रकृती मी पुरुष मी । आनंद मी अनानंद मी । विज्ञान मी अज्ञान मी । ऐसे जाणा रूप माझे ।। ३ ।। हे दृश्य जे चराचर । मीच नटले साचार । मजविण अणुमात्र । सृष्टी काही असेना ।। ४ ।। पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर । ऊर्ध्व अधर दिशा समग्र । सर्वत्र मी साचार । भरोनी राहे सर्वदा ।। ५ ।। मीच एकादश रुद्र । अष्टवसू मी दिगंतर । विश्वदेव द्वादश आदित्य । मीच सारे नटलेसे ।। ६ ।। त्वष्टा, पूषा आणि सोम । ब्रह्मा विष्णू महेश जाण । प्रजापती, भग, मित्रा, वरुण । मीच सारे नटलेसे ।। ७ ।। अग्नि मी अश्विनीकुमार । त्रैलोक्यात करी संचार । संपूर्ण जगद् ईश्वर । हेची जाणा रूप माझे ।। ८ ।। ऐसे ऐकोनी वचन । सर्व देव करिती नमन । नमो देव्यै म्हणोन । वंदन करिती देवीसी ।। ९ ।। अग्निसम

दैदीप्यमान । मंगलमयी तू परिपूर्ण । दुर्गादेवीते नमन । आम्ही सदा करीतसो ।। १० ।। दृष्टीआड राहोनी । विश्व चालवी गुप्तपणी । न कळे कोणा जिची करणी । त्या दुर्गे ते नमितसो ।। ११ ।। असो राजा अथवा रंक । पंडित अथवा मूर्ख । सर्वांसी करी कर्मप्रवृत्त । त्या दुर्गेसी नमितसो ।। १२ ।। अगाध सत्ता जिची । उगे राहो नेदी कवणासी । कर्मी बांधी जीवांशी । त्या दुर्गेते नमितसो ।। १३ ।। तृणापासोनी ब्रह्मापर्यंत । भूचर, जलचर, खेचर । मानव आणि इतर । सर्वां कर्मी लावीतसे ।। १४ ।। प्राणरूप, चैतन्यरूप । आनंद कामधेनू रूप । अन्न बल स्वरूप देत । त्या दुर्गेते नमितसो ।। १५ ।। काळाचा करी नाश । म्हणोनी वेद स्तवित । शिवशक्ती ब्रह्मशक्ती ऐक्य । दुर्गेदेवी नमोस्तुते ।। १६ ।। ॐ महालक्ष्मी च विद्महे । सर्व शक्त्यै च धीमहि । तन्नो देवी प्रचोदयात् ।। १७ ।। ऐसी महाशक्ती परात्पर । विश्वमोहिनी पाश अंकुशधर । ऐसे म्हणोनी अमर । स्तवन करिती दुर्गेचे ।। १८ ।। क ए ई ल ऱ्हीम् ह स क ह ल ऱ्हीम् सकल ऱ्हीम् । एषा असे महाविद्या । श्रीविद्या ब्रह्मविद्या ।

महात्रिपुरसुंदरी सद्या । प्रसन्न जाणा होतसे ।। १९ ।। ऐशा अंबेचे चिंतन । जे करिती मनापासोन । त्यांचे दु:ख आणि दैन्य । दूर जाणा होतसे ।। २० ।। हे दुर्गा दुर्गार्तीहारिणी । सदैव रक्षी आम्हा लागोनी । ऐसे म्हणोनी चरणी । देव वंदिते जाहले ।। २१ ।। हे संपूर्ण विश्व । श्री दुर्गेचे स्वरूप होय । अष्टवसू इंद्र चंद्र सूर्य । दुर्गा जाणा निर्धारि ।। २२ ।। पापहारिणी देवी । सर्व सौभाग्यदायिनी । सर्व मंगल स्वरूपिणी । दुर्गा जाणा निश्चये ।। २३ ।। तिसी जाता शरण । होई परम कल्याण । ऐसे म्हणोनी देवगण । प्रणाम करिती देवीते ।। २४ ।। 'ॐ' ऱ्हीम् 'ॐ' म्हणावा मंत्र । अथवा 'ऱ्हीम्' मंत्राचा जप । यानेची कृपा साध्य होत । दुर्गा सांगे देवांते ।। २५ ।। ॐ ऐम् ऱ्हीम् श्रीम् क्लीम् परमेश्वरी स्वाहा । आणखी मंत्र हा तुम्हा देते । सर्वार्थ याने साधते । दुर्गा म्हणे देवांसी ।। २६ ।। ऐकोनी देवीचे वचन । देवता संतोष पावोन । जय जय दुर्गे म्हणोन । वंदन करिती तिजलागी ।। २७ ।। आरुणी समान प्रभायुक्त । पाश अंकुश उभय हस्त । वरद अभय

मुद्रास्थित । मनोहर रूप दुर्गेचे ।। २८ ।। आरक्त वस्त्र नेसली । त्रिनेत्र चंद्रकोर भाळी । महादेवी करुणामयी । वंदन तुते करीतसे ।। २९ ।। नमितो तुते महादेवी । महाभय विनाशिनी । महासंकट हारिणी । दुर्गेदेवी नमोस्तुते ।। ३० ।। ब्रह्मादिका न कळे पार । अजन्मा अनंत मनोहर । अलक्ष्या अज्ञेया सर्वत्र । एकली पाहा राहतसे ।। ३१ ।। एकली राहे म्हणोनी 'एका' । विश्वरुपिणी म्हणोनी 'अनैका' । सर्व मंत्रांतील मातृका । ऐसी पाहा देवी ती ।। ३२ ।। चिन्मय रूपा सर्व साक्षिणी । शून्यातही शून्य साक्षिणी । सर्व परतरम् पाही । तुते दुर्गा म्हणतसो ।। ३३ ।। संसारार्णवतारक । दुराचार असुरनाशक । त्या दुर्गेसी शरणागत । होवोनी नमन करीतसे ।। ३४ ।। अथर्वशीर्ष स्तोत्र देवीचे । पठण करिता मनोवाचे । पंचदेवता स्तोत्राचे । पुण्य प्राप्त होतसे ।। ३५ ।। अष्टोत्तर शत पाठ । करिता पुण्य अद्‌भुत । सर्व संकटे टळत । कृपाप्रसादे दुर्गेच्या ।। ३६ ।। प्रात:काळी करिता पाठ । पाप त्यासी न लागत । रात्री करिता पाठ । अपार पुण्य मिळतसे ।। ३७ ।। मध्यरात्री

करिता पाठ । वाक्‌सिद्धी होतसे प्राप्त । मूर्ती सन्निध पाठ । प्राणप्रतिष्ठा होतसे ।। ३८ ।। अमृतसिद्धी पाहोनी । महादेवी सन्निधानी । करावा पाठ त्या दिनी । महामृत्यू ते जिंकावया ।। ३९ ।। ऐसे हे उपनिषद् । देवी-देवतांचा संवाद । ही गुप्तविद्या प्रकटत । ईश्वर भक्तांकारणे ।। ४० ।।

।। स्वस्ति देवी अथर्वशीर्ष संपूर्ण ।।

।। देवी सूक्त ।।

महादेवी नमोस्तुते । शिवे कल्याणकारिणी । आदि माया प्रकृती । वंदन तुते करितसो ।। १ ।। अनादी सिद्ध तू नित्य । सर्व जगा प्रतिपाळीत । वंदन तुते करीत । सुखदायिनी तुज नमो ।। २ ।। रौद्रा नमो नित्या नमो । दुर्गे कल्याण कारिणी । ज्योत्स्ना नमो नित्या नमो । अंबा अर्ध मातृका ।। ३ ।। ऋद्धी नमो सिद्धी नमो । नमो नैऋती भूभृता । शिवा लक्ष्मी ख्याता । दुर्गेदेवी नमो तुज ।। ४ ।। अति सौम्या नमो अति रुद्रा नमो । जगत् पालिनी नमोस्तुते । जगदाधार दुर्गे तू । स्वीकारी नमन आमुचे ।। ५ ।। दुर्गे सर्व प्राणीमात्रांत । विष्णुमाया तूचि होत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ६ ।। दुर्गे सर्व भूतांत । चेतना रूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ७ ।। दुर्गे सर्व मानवांत । बुद्धी रूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ८ ।। दुर्गे सर्व

प्राणिमात्रांत । निद्रारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ९ ।। दुर्गे सर्व प्राणिमात्रांत । क्षुधारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। १० ।। दुर्गे सर्व प्राणिमात्रांत । छायारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ११ ।। दुर्गे सर्व प्राणिमात्रांत । शक्ती रूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। १२ ।। दुर्गे सर्व प्राणिमात्रांत । तृष्णारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। १३ ।। दुर्गे उत्तम मानवांत । क्षमारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। १४ ।। दुर्गे सर्व प्राणिमात्रांत । विविधत्त्व रूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। १५ ।। दुर्गे सर्व मानवांत । लज्जारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। १६ ।। दुर्गे उत्तम मानवांत । शांती रूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। १७ ।। दुर्गे सर्व मानवांत । श्रद्धारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। १८ ।।

दुर्गे सर्व प्राणिमात्रांत । भ्रमरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। १९ ।। दुर्गे सुंदर मानवांत । सौंदर्य रूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। २० ।। दुर्गे काही मानवांत । लक्ष्मीरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। २१ ।। दुर्गे सर्व मानवांत । प्रवृत्तीरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। २२ ।। दुर्गे सर्व मानवांत । स्मृतीरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। २३ ।। दुर्गे सर्व मानवांत । दयारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। २४ ।। दुर्गे सर्व प्राणिमात्रांत । तृप्तीरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। २५ ।। दुर्गे सर्व मानवांत । भक्तीरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। २६ ।। दुर्गे काही मानवांत । ज्ञानरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। २७ ।। दुर्गे काही मानवांत । विवेकरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। २८ ।। दुर्गे काही मानवांत ।

दातृत्वरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। २९ ।। दुर्गे सर्व प्राणिमात्रांत । प्रेमरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ३० ।। दुर्गे श्रेष्ठ मानवांत । मानवतारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ३१ ।। दुर्गे काही मानवांत । सहनशक्तीरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ३२ ।। दुर्गे सर्व योग्यांत । तपरूपाने तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ३३ ।। दुर्गे सर्व योग्यांत । नादरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ३४ ।। दुर्गे सर्व योग्यांत । बिंदुरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ३५ ।। दुर्गे सर्व योग्यांत । कलारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ३६ ।। दुर्गे सर्व योग्यांत । प्रज्ञारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ३७ ।। दुर्गे सर्व योग्यांत । ऋतंभरारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ३८ ।। दुर्गे सर्व योग्यांत । धारणारूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते ।

तुज नमस्कार आमुचा ।। ३९ ।। दुर्गे सर्व योग्यांत । ध्यानरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ४० ।। दुर्गे सर्व योग्यांत । समाधीरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ४१ ।। दुर्गे सर्व विश्वात । शून्य जे ते तूचि असत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ४२ ।। दुर्गे अक्षर प्रांतात । महाशून्य तूचि असत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ४३ ।। दुर्गे सर्व ब्रह्माण्डात । ब्रह्मरूपे तू राहत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ४४ ।। दुर्गे आदि अंतातीत । परमशून्य तूचि असत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार आमुचा ।। ४५ ।। दुर्गे सर्व प्राणिमात्रांस । जगन्माता तू असत । नमोस्तुते नमोस्तुते । तुज नमस्कार सर्वदा ।। ४६ ।। सर्व इंद्रियांची अधिष्ठात्री । प्राणिमात्रांमध्ये व्याप्ती । राहोनी सर्वांपरती । ऐशा दुर्गे नमो तुज ।। ४७ ।। या विश्वामाजी चैतन्य । भरले असे जे गुप्त । तेची दुर्गे तू असत । तुज नमस्कार आमुचा ।। ४८ ।। इंद्रादी देवतांनी । स्तविले दुर्गे पूर्वी तुजसी । वारी आमुच्या

विपत्तीसी । म्हणोनी आम्ही प्रार्थितो ।। ४९ ।। विनम्रतेने करता स्मरण । जगदंबा येई धावोन । त्या परमेश्वरीते वंदन । करितो भक्तिभावाने ।। ५० ।। देव संकटाते वारी । आपत्तीते दूर करी । ऐसी दुर्गा परमेश्वरी । तुज नमस्कार आमुचा ।। ५१ ।।

।। स्वस्ति देवी सूक्त संपूर्ण ।।

।। नारायणीस्तुती ।।

श्रीगणेशाय नमः । श्री सरस्वत्यै नमः । ॐ ऐम् ह्रीम् श्रीम् क्लीम् परमेश्वरी स्वाहा । उदित सूर्या समान । जिची अंगकांती जाण । अर्धचंद्र मुकुट जाण । भाळी जिच्या मिरवीतसे ।। १ ।। तीननेत्र सुहास्य वदन । सौंदर्याची जी खाण । वरद अभय पाश अंकुश मुद्रा पूर्ण । सदैव रक्षी भक्तासी ।। २ ।। त्या भुवनेश्वरीते वंदन । प्रथम तिचे करून ध्यान । पुढील कथा सांगेन । ऋषी म्हणती रायासी ।। ३ ।। महादैत्याधिपती शुंभ होता मृत । देवीचा जयजयकार करीत । पातले सर्व देव तेथ । जेथे होती जगदंबा ।। ४ ।। अग्रिते पुढे करोन । देवीचे करिती स्तवन । सर्वही प्रसन्नवदन । होते पाहा तेधवा ।। ५ ।। जगन्माता व्हावे प्रसन्न । विश्वेश्वरी व्हावे प्रसन्न । करावे विश्वाचे रक्षण । विश्व आधीन तुझ्या असे ।। ६ ।। तू जगतासी आधार । पृथ्वी तव रूप साचार । जलरूपे तू समग्र । तृप्ती देसी जगताते ।। ७ ।। तू वैष्णवी पराक्रमी । विश्व बीज तू विश्वस्वामिनी । तू माता जगन्मोहिनी । मोहून ठेवीसी सर्वांते ।। ८ ।। तू होता प्रसन्न ।

भक्ताते मोक्ष प्राप्त । होवोनी ईश्वराशी युक्त । सदा सर्वदा राहे तो ।। ९ ।। विद्या सर्व तुझी रूपे । स्त्रिया सर्व तुझी रूपे । तू व्यापक विश्वाते । कोण स्तवो शके तुज ।। १० ।। सर्वव्यापक देवी । स्वर्गमुक्ती प्रदायिनी । याहूनी स्तवन वचनी । काय आणि ते सांगावे ।। ११ ।। सर्वांसी बुद्धी तू देसी । हृदयी सर्वांच्या राहसी । स्वर्ग– मोक्ष प्रदान करिसी । नारायणी नमोस्तुते ।। १२ ।। परिणाम परिवर्तन । हेची तुझे स्वरूप प्रमाण । विश्वातीत चैतन्य । नारायणी नमोस्तुते ।। १३ ।। सर्व मंगलाचेही मंगल । सर्व इच्छा करिसी पूर्ण । गौरी त्र्यंबके शरण । नारायणी नमोस्तुते ।। १४ ।। सृष्टी स्थिती विनाश शक्ती । सनातन तू दिव्यशक्ती । सर्व गुणातीत गुणमयशक्ती । नारायणी नमोस्तुते ।। १५ ।। दीन शरणागताचे रक्षण । ब्रीद तुझे परित्राण । करिसी दु:खाचे हरण । नारायणी नमोस्तुते ।। १६ ।। हंसयुक्त विमानात । ब्रह्माणीरूपे राहत । कुशयुक्त जल सिंचित । नारायणी नमोस्तुते ।। १७ ।। त्रिशूल हाती माथा चंद्र । महावृषभावरी बैसत । माहेश्वरी या रूपात । नारायणी नमोस्तुते ।। १८ ।।

मयूर कुक्कुट वेष्टीत । महाशक्ती धारण करीत । कौमारी या रूपात । नारायणी नमोस्तुते ।। १९ ।। शंख चक्र गदा धरीत । शारंग हाती धरीत । वैष्णवी या रूपात । नारायणी नमोस्तुते ।। २० ।। महाचक्र हाती धरीत । वसुंधरा दाढे उचलत । वाराही या रूपात । नारायणी नमोस्तुते ।। २१ ।। त्रैलोक्याचे करी रक्षण । दैत्यांचे करी हनन । नारसिंही या रूपात । नारायणी नमोस्तुते ।। २२ ।। हाती महावज्र धरीत । सहस्त्र नयन प्रज्वलित । ऐंद्री वृत्र प्राण हरीत । नारायणी नमोस्तुते ।। २३ ।। दैत्य सेनेचा संहार करीत । भयंकर रूप धरीत । शिवदूती या स्वरूपात । नारायणी नमोस्तुते ।। २४ ।। विकराल उग्र दिसत । विकट गर्जना करीत । चामुण्डा या रूपात । नारायणी नमोस्तुते ।। २५ ।। लक्ष्मी लज्जा महाविद्या । श्रद्धा पुष्टी अविद्या । राही विविध रूपात । नारायणी नमोस्तुते ।। २६ ।। मेधा श्रेष्ठा ऐश्वर्या । सर्व विश्वाची अधिष्ठाता । सरस्वती या रूपात । नारायणी नमोस्तुते ।। २७ ।। सर्वेश्वरी सर्व रूपात । सर्व शक्ती सर्व भय हरीत । दुर्गादेवी रूपात । नारायणी नमोस्तुते ।। २८ ।। तीन

नेत्रांनी शोभत । सर्व भयापासून रक्षित । कात्यायनी या रूपात । नारायणी नमोस्तुते ।। २९ ।। भयंकर ज्वाला ओकीत । ऐसा त्रिशूल हातात । भद्रकाली या रूपात । नारायणी नमोस्तुते ।। ३० ।। दुष्ट कर्मापासून । माता रक्षी पुत्रा लागोन । तू करी तैसे रक्षण । पापा पासून आमुचे ।। ३१ ।। असुरांचे करुनी हनन । तुझे खड्ग झाले पावन । चण्डिके करी कल्याण । नमन तुते करीतसो ।। ३२ ।। तू होता प्रसन्न । जाती सर्व रोग आपदा पळोन । तुझा आश्रित होता जाण । आश्रित त्याचे जग होई ।। ३३ ।। धर्मद्रोही महादैत्य । अनेक रूपाने त्याते मारीत । ऐसे कोण करीत । विश्वामाजी तुझेविना ।। ३४ ।। तुझ्याविण ऐसी कवण शक्ती । जी जीवांते भ्रमविती । वेदांमध्ये तुझी ख्याती । वर्णिली ऐसी आहे हो ।। ३५ ।। यक्ष राक्षसापासून । विष सर्पा पासोन । शत्रूठगां पासोन । रक्षी दुर्गे आम्हाते ।। ३६ ।। विश्वेश्वरी विश्वाचे पालन । विश्व सर्व तव आधीन । तुझ्या चरणी नम्र । राहो आम्ही सर्वदा ।। ३७ ।। देवी प्रसन्न व्हावे । सदैव आम्हाते रक्षावे । जगताचे पाप हरावे । म्हणोनी आम्ही प्रार्थितो ।। ३८ ।। विश्व दु:ख

हरीत । आम्ही तव शरणागत । त्रैलोक्य वासिनी दुर्गा देत । वरप्रदान देवांना ।। ३९ ।। देवी म्हणे मी प्रसन्न । मागा आता वरदान । जेणे जगाचे कल्याण । होईल ऐसे मागावे ।। ४० ।। सर्व बाधा निवारी । शत्रुत्वाचा विनाश करी । त्रैलोक्यवासी ईश्वरी । वर देई आम्हाते ।। ४१ ।। हेची कार्य राही करत । एवढे देई आम्हा प्रत । तिन्ही लोका ठेवी शांत । ऐसे करी दुर्गे तू ।। ४२ ।।

।। स्वस्ति नारायणीस्तुती संपूर्ण ।।

।। श्री दुर्गास्तुती ।।

श्री गणेशाय नमः । श्री सरस्वत्यै नमः । ॐ ऐम् ह्रीम् श्रीम् क्लीम् परमेश्वरी स्वाहा ।। प्रथमं शैलपुत्रीच । द्वितीयं ब्रह्मचारीणी । तृतीयं चन्द्रघण्टेती । कूष्माण्डेती चतुर्थकम् ।। १ ।। पंचमम् स्कन्द मातेती । षष्ठं कात्यायनीती च । सप्तमं काल रात्रीती । महागौरीती चाष्टमम् ।। २ ।। नवमं सिद्धीदात्री च । नवदुर्गा प्रकीर्तीता । ब्रह्मदेव सांगता । जाहला पाहा सर्वांसी ।। ३ ।। शिव म्हणे अंबेसी । या भयंकर कली युगासी । तू एक त्वरित पावसी । कलौ चण्डी विनायकौ ।। ४ ।। म्हणोनी सर्व कार्य साधक । उपाय सांगे त्वरित । जेणे भक्त मनोरथ । पूर्ण होती निश्चये ।। ५ ।। देवी म्हणे ईश्वरासी । दुर्गा सप्तशती ग्रंथासी । प्रकट केले भूमीसी । सर्वार्थ सिद्धी दायक जे ।। ६ ।। त्याचे करिता पाठ । पूर्ण होती मनोरथ । सर्वोत्कृष्ट साधन असत । सप्तशती म्हणोनिया ।। ७ ।। पंडित आणि महाज्ञानी । ऐशा जना पाहोनी । ठेवी विविध प्रकारे मोहोनी । देवी महामाया ती ।। ८ ।।

तुझ्या कृपेने धर्माचरण । तुझ्या कृपेने तीर्थाटन । तुझ्या कृपेने पुरश्चरण । होती हातून मानवाच्या ।। ९ ।। तिन्ही लोकी तू श्रेष्ठ । देसी भक्तांते मनोवांच्छित । तू सदा दयार्द्र चित्त । कृपा करिसी भक्तासी ।। १० ।। जगासी व्हावे सुख प्राप्त । म्हणोनी दुष्टांसी तू वधित । अन्यथा तुझे शत्रुत्व । नाही पाहा कोणासी ।। ११ ।। कृपा आणि निष्ठुरता । कैसी पाहा हे साम्यता । श्रेष्ठ तिन्ही लोकांत । म्हणोनी अससी देवी तू ।। १२ ।। त्रिशूले रक्ष देवी तू । अंबे खड्गाने रक्ष तू । घंटा धनुष्याने तू । सदैव रक्षी आम्हासी ।। १३ ।। पूर्व–पश्चिम दक्षिण–उत्तर । फिरवी त्रिशूल सुंदर । रक्षी–रक्षी सत्वर । श्री दुर्गे परमेश्वरी ।। १४ ।। तिन्ही लोकांमध्ये काही । सुंदर भयंकर देही । विचरत सर्व स्थळीही । त्यापासून तू रक्षावे ।। १५ ।। ऊर्ध्व अधर दिशा दाही । रक्ष रक्ष दुर्गे पाही ।। खड्ग शूल गदा सर्वही । शस्त्रे घेवोनी रक्षावे ।। १६ ।। सर्व मंगलाचेही मंगल । सर्व इच्छा करिसी पूर्ण । गौरी त्र्यंबके शरण । नारायणी नमोस्तुते ।। १७ ।। दीन शरणागताचे रक्षण । ब्रीद तुझे परित्राण । करिसी

दु:खाचे हरण । नारायणी नमोस्तुते ।। १८ ।। सर्वेश्वरी सर्व रूपांत । सर्व शक्ती भय हरीत । दुर्गादेवी रूपात । नारायणी नमोस्तुते ।। १९ ।। तू होता प्रसन्न । जाती सर्व रोग आपदा पळोन । तुझा आश्रित होता जाण । आश्रित त्याचे जग होई ।। २० ।। सर्व बाधा निवारी । शत्रुत्वाचा विनाश करी । त्रैलोक्यवासी ईश्वरी । वर देई आम्हाते ।। २१ ।। हेची कार्य राही करत । एवढे देई आम्हा प्रत । तिन्ही लोका ठेवी शांत । ऐसे करी दुर्गे तू ।। २२ ।।



।। स्वस्ति श्रीदुर्गास्तुती समाप्त ।।

ओवी संख्या ३३३

